# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हींसेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट, १९२३ द्वारा स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित विद्यापीठ)

**(निवडणूक कक्ष)**

जमनालाल बजाज प्रशासकीय भवन, महात्मा जोतिबा फुले शैक्षणिक परिसर, कॅम्पस चौक ते अंबाझरी टी—पॉईंट मार्ग, नागपूर — ४४० ०३३

ई—मेल: arga@nagpuruniversity.nic.in


क्रमांकः रातुमनावि/साप्र/निक/स/२८८ दिनांक : २ मार्च, २०२३

## —: प रि प त्र क :—

## विद्यापीठ अधिसभा नोंदणीकृत पदवीधरांची निवडणुक—२०२२

सर्व संबंधितांना सूचित करण्यात येते की, विद्यापीठ अधिसभेच्या नोंदणीकृत पदवीधर निवडणुकीसंदर्भात विद्यापीठाद्वारे अधिसूचना क्र. रातुमनावि/साप्र/ २०२२/२९, दिनांक २० डिसेंबर २०२२ अन्वये घोषित करण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार, विद्यापीठ अधिसभेच्या नोंदणीकृत पदवीधरांची निवडणुक **रविवार, दिनांक १९ मार्च २०२३ रोजी सकाळी ८.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत** विविध मतदान केन्द्रावर संपन्न होणार आहे. विद्यापीठ अधिसभेच्या नोंदणीकृत पदवीधरांच्या निवडणुकीच्या कामाकरिता विद्यापीठ आणि महाविद्यालयातील प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची मतदान केंद्रावर केंद्राध्यक्ष, केंद्राधिकारी व केंद्रसहायक म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे.

वरील प्रमाणे नियुक्त करण्यात आलेल्या ज्या प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे नाव नोंदणीकृत पदवीधरांच्या मतदार यादीत नाव समाविष्ट आहे, अशा प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी त्यांनी सोबत जोडलेल्या अर्जात आपली माहिती नमुद करून arga@nagpuruniversity.nic.in / registrar@nagpuruniversity.nic.in ई—मेलद्वारे किंवा प्रत्यक्षरित्या विद्यापीठाच्या निवडणूक कक्षात दिनांक ९ मार्च २०२३ पर्यंत किंवा तत्पूर्वी सादर करावी, जेणे करून संबंधितांना मतदान करण्याची संधी उपलब्ध होवू शकेल.

(डॉ. राजू हिवसे)
कुलसचिव तथा निवडणूक निर्णय अधिकारी

प्रतिलीपी :—

१. मतदान केंद्र असलेले विद्यापीठाशी संलग्नित/संचालित व स्वायत्त महाविद्यालयांचे सर्व प्राचार्य/संचालक,
२. विद्यापीठ शैक्षणिक विभागांचे सर्व विभाग प्रमुख
३. विद्यापीठातील सर्व अधिकारी व शाखा प्रमुख

आपणास विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावे.

(प्रदीप बिनीवाले)
उपकुलसचिव (सा.प्र.) तथा
सहायक निवडणूक निर्णय अधिकारी

प्रति,

मा. कुलसचिव तथा निवडणूक निर्णय अधिकारी,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,
नागपूर.

विषय: विद्यापीठ अधिसभेच्या नोंदणीकृत पदवीधर निवडणुकीच्या मतदानाबाबत.

संदर्भ: विद्यापीठाचे पत्र क्रमांक रातुमनावि/साप्र/निक/२०२३/स/२८८, दिनांक : २ मार्च, २०२३

महोदय,

आपल्या संदर्भिय परिपत्रकाला अनुसरून मी आपणास विनंतीपूर्वक कळवितो/कळविते की, विद्यापीठ अधिसभेच्या नोंदणीकृत पदवीधर निवडणुकीकरिता माझी केंद्राध्यक्ष/केंद्राधिकारी/केद्रसहायक म्हणून निवडणूकीच्या कामाकरिता नियुक्ती करण्यात आली आहे. नोंदणीकृत पदवीधर निर्वाचक गणाच्या मतदार यादीत माझे नाव समाविष्ट आहे.

करिता आपणास नम्र विनंती की, मला मतदानाचा हक्क बजावण्याच्या दृष्टीने माझे नाव मला नियुक्त करण्यात आलेल्या मतदान केंद्राच्या नोंदणीकृत पदवीधरांच्या मतदार यादीत समाविष्ट करून उपकृत करावे. याबाबतची विस्तृत माहिती मी खालील प्रमाणे सादर करीत आहे.

| मतदार यादीत असलेले पूर्ण नाव व भ्रमणध्वनी क्रमांक | मतदार क्रमांक | मतदार यादीत असलेला मतदान केंद्र क्रमांक | निवडणुकीच्या कामाकरिता नियुक्त करण्यात आलेल्या मतदान केंद्राचा क्रमांक |
|---|---|---|---|
| | | | |

आपला/आपली विनीत,

(——————————)